दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
Web portal : hinduprakashwarta.com
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ शुक्रवार, दि. ०३ जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ७४ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

**पाहिजेत**

श्री VARAD CONSTRUCTION

श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी संभाजीनगर येथे 3 वर्ष अनुभव असलेल्या सिव्हिल इंजिनिअर च्या जागा भरणे आहे.इच्छुक उमेदवार यांनी ईमेल आयडी नंबर shrivaradconstructionco@gmail.comवर आपले अर्ज पाठवावे किंवा मोबाईल नंबर 9923104521/9226611011वर संपर्क साधावा.

कार्यालय : श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी, नंबर 515,5वा माळा, वास्तू इलाईट स्क्वेअर बीड बायपास रोड छत्रपती संभाजी नगर येथे कार्यालयीन वेळेत समक्षात भेटावे.

## परभणी जिल्ह्यास यलो अलर्ट

हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी.

**परभणी:**भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार परभणी जिल्ह्यास २ जुलै ते ३ जुलै २०२६ या कालावधीत 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. या काळात जिल्ह्यात वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असल्याने नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा सचिव (जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण) अनुराधा ढालकरी यांनी केले आहे.

# 'याल्ला-याल्ला' आणि 'आईच्या गावात' रेस्टॉरंटचे परवाने निलंबित!

## स्वयंपाकघरात बुरशी आलेले अन्न, घातक रंगांचा वापर आणि अस्वच्छता; सहआयुक्त श्रीराव करकळे यांची मोठी कारवाई

हिंदू प्रकाशवार्ता /प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : शहरातील हॉटेल आणि रेस्टॉरंट्समध्ये ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या घटकांविरुद्ध अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाने अत्यंत कडक पाऊल उचलले आहे. अन्न सुरक्षा व मानकांचे सर्रास उल्लंघन करणाऱ्या शहरातील दोन नामांकित रेस्टॉरन्ट्सवर अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी थेट धाड टाकून त्यांचे परवाने पुढील आदेशापर्यंत निलंबित केले आहेत. या धडक कारवाईत 'याल्ला-याल्ला रेस्टॉरन्ट' (गजानन महाराज मंदिर रोड) आणि 'आईच्या गावात' (इतखेडा) या दोन रेस्टॉरंट्सचा समावेश आहे. अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंडे यांनी २३ जून रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, छत्रपती संभाजीनगर विभागात गेल्या दोन दिवसांपासून (३० जूनपासून) ही विशेष तपासणी मोहीम राबवली जात आहे, अशी माहिती सहआयुक्त (अन्न) श्रीराव करकळे यांनी दिली.ग्राहकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या कोणत्याही हॉटेलचालकाची गय केली जाणार नाही. नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी या दोन्ही रेस्टॉरंट्सचे परवाने पुढील आदेशापर्यंत निलंबित करण्यात आले आहेत," अशी कडक माहिती सहआयुक्त श्रीराव करकळे यांनी दिली. या धडक आणि यशस्वी कारवाईत अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती व.ता. रोडे, श्रीमती कि.ल. झाडे आणि सहाय्यक आयुक्त द.वि. पाटील यांनी थेट सहभाग घेतला. एफडीएच्या या आक्रमक पवित्र्यामुळे शहरातील इतर हॉटेल चालकांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.







### याल्ला-याल्ला रेस्टॉरन्ट (गजानन महाराज मंदिर रोड):

**घातक रंगांचा वापर:** बटर चिकन, पनीर ग्रीन, हरियाली कबाब, चिकन लॉलीपॉप यांसारख्या लोकप्रिय पदार्थांमध्ये तसेच सर्व प्रकारच्या तयार ग्रेव्हीमध्ये कृत्रिम आणि अखाद्य अन्न रंगांचा बेकायदेशीर वापर केला जात होता. प्रशासनाने रंगांचे हे डबे जप्त करून जागीच नष्ट केले.

**भयानक अस्वच्छता:** स्वयंपाकघरात अन्न तयार करण्याच्या ठिकाणी प्रचंड अस्वच्छता आढळली. भाज्यांवर बुरशी आणि काळे डाग पडले होते.

**उघड्यावरील अन्न:** तयार ग्रेव्ही आणि कच्चे अन्नपदार्थ उघड्यावर, अत्यंत निकृष्ट दर्जेदार स्थितीत साठवले होते.

**नियमभंग:** हॉटेलच्या आवारात 'पिण्याचे पाणी विनामूल्य उपलब्ध आहे' असा कोणताही फलक लावलेला आढळला नाही.

### आईच्या गावात रेस्टॉरन्ट (इटखेडा):


**बटरच्या नावाखाली फसवणूक:** ग्राहकांना बटर तंदूर, बटर रोटी, बटर नान सांगून प्रत्यक्षात अत्यंत स्वस्त आणि निकृष्ट दर्जाचे 'प्रोफेशनल फॅट स्प्रेड' वापरले जात असल्याचे रंगेहात पकडले गेले.

**कचरा आणि अन्न एकाच ठिकाणी:** स्वयंपाकघरात कमालीची अस्वच्छता असून, कच्चा माल आणि कचरापेटी एकाच ठिकाणी ठेवण्यात आली होती. अन्नपदार्थ साठवण्यासाठी घातक प्लास्टिक ड्रमचा वापर केला जात होता.

**शिळ्या व बुरशीयुक्त भाज्या:** इथेही स्वयंपाकघरात बुरशी लागलेले अन्नपदार्थ आणि शिळ्या पालेभाज्या आढळून आल्या. तसेच कृत्रिम रंगांचा वापर आणि विनामूल्य पाण्याच्या फलकाचा अभाव दिसून आला.

## थोडक्यात वार्ता

### 'एआय विनाशकारी; मानवी हस्तक्षेप आवश्यक' - सर्वोच्च न्यायालय



**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने न्यायालयांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करण्याबाबत सावधगिरीचा इशारा दिला. न्यायालयाने म्हटले की, "जर यावर कोणतेही नियंत्रण ठेवले नाही, तर ती (एआय) आपल्या बौद्धिक कार्यपद्धतीत घुसखोरी करू शकते आणि लवकरच आपल्याला तिच्या अफाट क्षमतेवर अवलंबून राहण्यास भाग पाडू शकते." न्यायमूर्ती पी. एस. नरसिम्हा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या खंडपीठाने 'नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल' (एनसीएलटी) आणि 'नॅशनल कंपनी लॉ अपिलेट ट्रिब्युनल' (एनसीएलएटी) चे आदेश रद्द केले; कारण या आदेशांमध्ये एआय द्वारे तयार केलेल्या बनावट निकालांचा आधार घेण्यात आला होता. न्यायालयाने नमूद केले की, एनसीएलटचा २८ ऑगस्ट २०२४ चा आदेश आणि एनसीएलटचा ११ सप्टेंबर २०२५ चा आदेश यामध्ये अस्तित्वात नसलेल्या निकालांचा संदर्भ देण्यात आला होता; तसेच जिथे संदर्भ बरोबर होते, तिथे त्यातील मजकुरात एआय द्वारे तयार केलेले परिच्छेद समाविष्ट होते.

### लग्नाचं आमिष, अत्याचार अन् धर्म पाळण्याची सक्ती

**नाशिक :** नाशिकमध्ये पुन्हा एकदा धर्मांतराचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. उदरनिर्वाहासाठी परराज्यातून नाशिकमध्ये आलेल्या एका ४१ वर्षीय महिलेची असहाय्यता ओळखून तिच्यावर अत्याचार केल्याचा आणि लग्नाचे आमिष दाखवत तिच्यावर दुसऱ्या धर्माच्या परंपरा पाळण्याची सक्ती केल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणातील संशयित रियाज बुराउद्दिन शेख (वय ४०, रा. संजीवनीनगर, अंबड) याचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. पीडित महिला ही मूळची नवी दिल्ली येथील असून, गेल्या काही वर्षांपासून ती नाशिकमध्ये वास्तव्यास आहे. कुटुंबापासून दूर राहून उदरनिर्वाहासाठी बाहेर पडत संघर्ष करत असताना २०२० मध्ये रविवार कारंजा परिसरात भाजी विक्री करणाऱ्या रियाज शेख याच्याशी तिची ओळख झाली. सुरुवातीला मैत्री, त्यानंतर प्रेम आणि पुढे लग्नाचे आमिष दाखवत संशयिताने तिचा विश्वास संपादन केला, असे फिर्यादीत नमूद आहे. धक्कादायक म्हणजे महिलेचा विश्वास पूर्णपणे जिंकल्यानंतर संशयिताने तिचे आधार कार्ड, पॅनकार्ड तसेच बँकेचे पासबुक स्वतःच्या ताब्यात घेतले. त्यामुळे पीडित महिला पूर्णपणे त्याच्यावर अवलंबून राहील, अशी परिस्थिती निर्माण करण्यात आल्याचा आरोप आहे.

### नशा पान करण्यात वापरण्यात येणारा औषधाचा साठा ताब्यात

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी:** रात्रीच्या गस्तीवर असलेल्या पोलीस अधीक्षक यांच्या विशेष पथकाने गुरुवार दोन जुलै रोजी मध्यरात्रीच्या सुमारास खंडोबा बाजार परिसरात कारवाई करत नशे च्या गुंगी साठी वापरण्यात येणाऱ्या औषधाच्या द्रव्याचा मोठा साठा जप्त केला आहे या कारवाई एकूण दोन लाख तीस हजार आठशे आठ रुपयांचा मुद्देमाल तीन जनावर नानलपेट पोलिसात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक साहेबांनी गुन्हेगारीवर वचक बसवण्यासाठी व गुन्हेगाराचे सर्वेक्षण करण्यासाठी विशेष पथकाची स्थापना केली.

# छत्रपती संभाजीनगरमधील 391 जि. प. शाळा मृत्यूच्या छायेत; विद्यार्थ्यांची सुरक्षा ऐरणीवर

हिंदू प्रकाशवार्ता / प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** ग्रामीण भागातील शिक्षणाचा कणा समजल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद शाळांची अवस्था सध्या अत्यंत दयनीय झाली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील एकूण २,०८४ शाळांपैकी तब्बल ३९१ शाळांची अवस्था अत्यंत खराब झाली असून, त्या कोणत्याही क्षणी कोसळतील की काय, अशी भीती निर्माण झाली आहे.

पावसाळा ऐन रंगात आलेला असताना या शाळांच्या दुरुस्तीकडे प्रशासनाने साफ दुर्लक्ष केल्यामुळे विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात आला आहे. या प्रकरणी जिल्हा परिषद सदस्य राधाकृष्ण पठाडे यांनी आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला धारेवर धरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील अनेक शाळांच्या इमारतींची छते, भिंती आणि वर्गखोल्या निकृष्ट दर्जाच्या झाल्या आहेत. पावसाचे पाणी थेट वर्गात गळत असल्याने विद्यार्थ्यांना बसणेही कठीण झाले आहे. भिंतींना तडे गेल्यामुळे कोणतीही दुर्घटना घडण्याची भीती पालकांमध्ये आणि शिक्षकांमध्ये पसरली आहे. पावसाचे पाणी थेट वीज मंडळाच्या बोर्डाजवळून गळत असल्याने शॉर्ट सर्किट होण्याची भीती शिक्षकांनी व्यक्त केली आहे. अनेक ठिकाणी सुरक्षिततेचा उपाय म्हणून वर्गखोल्या बंद ठेवण्याची वेळ आली आहे, ज्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर होत आहे. ऐन पावसाळ्यात उघडकीस आलेल्या या प्रकारामुळे जिल्हा परिषद वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. १४ कोटींचा उपकर निधी केवळ इमारतीच्या किरकोळ कामांवर खर्च करण्याऐवजी, त्याचा काही हिस्सा तात्काळ शाळा दुरुस्तीसाठी वर्ग करावा, अशी मागणी आता जोर धरत आहे. विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळणाऱ्या या सुस्त प्रशासनाविरोधात आता पठाडे यांच्या नेतृत्वाखाली पालकांसह मोठे आंदोलन उभे राहण्याची चिन्हे दिसत आहेत. परिणामी, आता यावर मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### शाळा सोडून मुख्यालयाच्या इमारतीला प्राधान्य?

**एकीकडे ग्रामीण भागातील ३९१ शाळा वर्षानुवर्षे दुरुस्तीच्या आणि निधीच्या प्रतीक्षेत 'मृत्यूच्या छायेत' उभ्या आहेत. तर दुसरीकडे, जिल्हा परिषद प्रशासनाने आपल्या उपकर (सेस) निधीतून तब्बल १४ कोटी रुपये नवीन झेडपीच्या इमारतीच्या किरकोळ कामांसाठी मंजूर केले आहेत. प्रशासकीय सोयीसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी वळवला जात असताना, चिमुरड्यांच्या सुरक्षिततेसाठी मात्र निधीचा तुटवडा भासत असल्यामुळे नागरिक आणि पालकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.**

### शाळांची अवस्था पाहवत नाही



**"अनेक ग्रामीण भागातील शाळांची अवस्था पाहवत नाही. शाळा अक्षरशः मृत्यूच्या छायेत आहेत. छतावरून पाणी गळत असल्याने वर्गखोल्यांमध्ये ओल आली आहे. त्यातच जिल्हा परिषद उपकर निधीतून १४ कोटी रुपये नवीन इमारतीच्या किरकोळ कामांसाठी खर्च केले जात आहेत. प्रशासनाला स्वतःची नवीन इमारत विद्यार्थ्यांच्या जीवापेक्षा महत्त्वाची आहे का? जर शाळांची त्वरित दुरुस्ती झाली नाही किंवा हा निधी शाळांकडे वळवला नाही, तर आम्ही थेट जिल्हा परिषद (झेडपी) कार्यालयातच शाळा भरवू!"**

**— राधाकृष्ण पठाडे, जिल्हा परिषद सदस्य**

# आकाशवाणी परिसरात भंगार व्यावसायिकाची क्रूर हत्या

## हल्लेखोरांच्या शोधासाठी चार पथके रवाना

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील कायदा व सुव्यवस्थेचे तीनतेरा वाजले असून, आता नागरिकांचे रात्रीच्या वेळी रस्त्यावरून फिरणेही कठीण झाले आहे. आपले व्यावसायिक काम आटोपून घराकडे पायी निघालेले भंगार व्यावसायिक अब्दुल बाशिद हकीम खान (वय ४५, रा. कैसर कॉलनी) यांची दोन अज्ञात गुंडांनी मांडीत चाकू खुपसून क्रूर हत्या केली.



ही धक्कादायक घटना आज, गुरुवारी (२ जुलै) पहाटे २.३० वाजण्याच्या सुमारास शहरातील अत्यंत वर्दळीच्या जालना रोडवरील आकाशवाणी परिसरातील पंचम बारसमोर घडली. हत्येनंतर हल्लेखोरांनी त्यांचा मोबाईल लुटून पळ काढला. गेल्या काही महिन्यांत शहरात सर्रास घडणाऱ्या लुटमारीच्या घटना आणि पोलिसांच्या ढिसाळ गस्तीमुळे आता सामान्यांचे रस्ते सुरक्षित राहिले नसल्याची तीव्र आणि संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहे. या खळबळजनक हत्याकांडाची सविस्तर हकीकत अशी की, मयत अब्दुल बाशिद हे आपल्या पत्नी आणि चार मुलांसह कैसर कॉलनी भागात राहत होते. गेल्या अनेक वर्षांपासून ते भंगार व्यवसाय करत होते. बुधवारी सायंकाळी ७ वाजेपर्यंत ते घरीच होते, त्यानंतर जेवण करून महत्त्वाच्या व्यावसायिक कामाचे कारण सांगत ते घराबाहेर पडले होते.काम आटोपून रात्री

-> पान 2 वर

### वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची धाव, तपास सुरु

**घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस उपायुक्त रत्नाकर नवले, सहाय्यक पोलीस आयुक्त मनोज पगारे, पोलीस निरीक्षक गणेश ताठे आणि गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन कल्याणकर यांनी घटनास्थळाची पाहणी केली. हल्लेखोर जालना रोडच्या दिशेने पसार झाले असून, त्यांचा शोध घेण्यासाठी सिडको, एमआयडीसी सिडको, मुकुंदवाडी, जिन्सी पोलीस ठाण्यांसह गुन्हे शाखेची ४ विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. पुढील तपास पोलीस करत आहेत.**

# शेतकऱ्यांचे वाहने अडवल्यास आता पोलिसांवरच कारवाई

## शेतीकामासाठी गाळ, मुरुमावरील रॉयल्टी रद्द; विहीर, गोठ्यासाठी गौण खनिज मोफत

**मुंबई :** बळीराजाला स्वतःच्या शेती सुधारणेसाठी, विहीर, गोठा किंवा शेतघर बांधण्यासाठी लागणाऱ्या माती आणि मुरूमासारख्या गौण खनिजांसाठी आता शासनाला एक रुपयाचीही रॉयल्टी (स्वामित्व धन) द्यावी लागणार नाही. इतकेच नव्हे, तर शेतकऱ्यांच्या मालकीचे ट्रॅक्टर किंवा बैलगाड्या अडवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणाऱ्या पोलीस किंवा महसूल अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत केली.

सभागृहातील आमदार संजय पुराम, अभिमन्यु पवार, गोपीचंद पडळकर, रत्नाकर गुट्टे, आशिष देशमुख, संतोष दानवे, सतीश देशमुख, नारायण कुचे, राजकुमार बडोले, आशिष जयसवाल, नाना पटोले आणि विजय वडेट्टीवार यांनी सातत्याने मांडलेल्या मागण्यांची दखल घेत शासनाने हा निर्णय घेतला. विशेष म्हणजे, घोषणेनंतर लगेच याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. राज्याची अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून असल्याने ग्रामीण भागाचा विकास जलद गतीने व्हावा, हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे.

# पाक गुप्तचर संस्था 'ISI' च्या नेटवर्कला मदत करणारा एजंट छत्रपती संभाजीनगरातून ताब्यात!

हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय लष्कराची गोपनीय आणि संवेदनशील माहिती पाकिस्तानची गुप्तचर संघटना 'आयएसआय'पर्यंत (ISI) पोहोचवणाऱ्या हेरगिरी रॅकेटला आर्थिक मदत पुरवणाऱ्या एका मुख्य एजंटला अटक करण्यात आली आहे.

राजस्थान पोलिसांच्या सीआयडी इंटेलिजन्सने छत्रपती संभाजीनगरमधून रफीक चाँद शेख (वय ४१) याला मंगळवारी (३० जून) बेड्या ठोकल्या. या मोठ्या कारवाईमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. आरोपी रफीक शेख याला गुरुवारी (२ जुलै) न्यायालयासमोर हजर करण्यात आले. पोलिसांनी चौकशीसाठी सात दिवसांची कोठडी मागितली होती, परंतु न्यायालयाने त्याची ६ दिवसांची (७ जुलैपर्यंत) पोलीस कोठडी मंजूर केली आहे.



राजस्थान पोलिसांच्या दाव्यानुसार, रफीक हा गेल्या ४ वर्षांपासून सोशल मीडियाच्या माध्यमातून थेट एका आयएसआय हँडलरच्या संपर्कात होता. तपासात समोर आले आहे की, हेरगिरीसाठी मिळणारा पैसा थेट आरोपींच्या खात्यात जात नव्हता. रफीक यामध्ये मध्यस्थ म्हणून काम करत होता आणि व्यवहारांची मूळ साखळी लपवण्यासाठी तो वेगवेगळ्या खात्यांचा वापर करायचा. त्याने स्वतःच्या आणि इतर काही लोकांच्या नावावर अनेक बँक खाती उघडली होती. या खात्यांद्वारे तो हेरगिरीच्या नेटवर्कला आर्थिक रसद (फंडिंग) पुरवत होता. सीआयडी इंटेलिजन्सने यापूर्वीच या रॅकेटमधील दोन मुख्य आरोपींना अटक केली आहे. झबरा राम (रहिवासी-जैसलमेर, राजस्थान), सुमित कुमार (एमटीएस कर्मचारी, दिब्रुगड एअर फोर्स स्टेशन, आसाम) या दोघांवर भारतीय लष्कराशी संबंधित गोपनीय कागदपत्रे आणि माहिती

-> पान 2 वर

# शताब्दी पार आजीबाईंना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचा मोठा दिलासा!

## शंभर वर्षे वय असणाऱ्या सरूबाई मुंजवार यांच्या शस्त्रक्रियेसाठी अवघ्या चोवीस तासांत आर्थिक मदत मंजूर; कुटुंबियांनी मानले मुख्यमंत्र्यांचे आभार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**परभणी :** गंभीर रस्ते अपघातामुळे उपचारासाठी आर्थिक अडचणीत सापडलेल्या शंभर वर्षीय वृद्ध आजीबाईंना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून अवघ्या चोवीस तासांत आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले आहे. शासनाकडून मिळालेल्या या तातडीच्या मदतीमुळे आजीबाईंवर आवश्यक ती शस्त्रक्रिया वेळेत पार पडली असून, त्यांच्यावर पुढील उपचार तातडीने सुरू करणे शक्य झाले आहे.

या संदर्भातील सविस्तर वृत्त असे की, परभणी येथील रहिवासी असलेल्या शंभर वर्षीय सरूबाई मुंजवार या रस्ता ओलांडत असताना एका भरधाव दुचाकीने त्यांना जोराची धडक दिली. या भीषण अपघातात त्यांच्या डाव्या मांडीला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर त्यांना तातडीने फलटण येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेथील डॉक्टरांनी त्यांची वैद्यकीय तपासणी करून मांडीवर तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. मात्र, या शस्त्रक्रियेसाठी आणि पुढील उपचारासाठी सुमारे सव्वा लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याने आजीबाईंच्या कुटुंबासमोर अचानक मोठा आर्थिक प्रश्न निर्माण झाला होता.

या कठीण प्रसंगात नातेवाईकांच्या माध्यमातून त्यांना 'मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी' योजनेची माहिती मिळाली. त्यानुसार रुग्णालयाच्या व्यवस्थापनाने सहकार्य करत जून महिन्याच्या अखेरीस या आर्थिक सहाय्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाकडे रीतसर अर्ज सादर केला. अर्ज प्राप्त होताच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाने संवेदनशीलतेने पावले उचलली. त्यांनी आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांची पडताळणी करून या प्रकरणावर तातडीने कार्यवाही केली आणि अवघ्या चोवीस तासांत आर्थिक सहाय्य मंजुरीचे आदेश जारी केले. त्यामुळे उपचारात कोणताही खंड न पडता आजीबाईंना वेळेत वैद्यकीय सेवा उपलब्ध झाली.




या तातडीच्या मदतीबद्दल सरूबाई मुंजवार यांच्या कुटुंबीयांनी तीव्र समाधान व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून आभार मानले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली या कक्षाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना उपचारासाठी आवश्यक असणारा निधी कमीत कमी कालावधीत उपलब्ध करून देण्यास सर्वोच्च प्राधान्य दिले जात आहे. आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यास अगदी अल्पावधीत आर्थिक सहाय्य मंजूर करण्याची कार्यपद्धती प्रशासनाने अवलंबिली आहे. राज्यातील गरजू रुग्णांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत अधिक माहिती अथवा मार्गदर्शनासाठी टोल फ्री क्रमांक १८०० १२३ २२११ वर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

## "खरं की काय"



# संपादकीय

## 'खाकी'च्या क्रूरतेवर न्यायालयाचा हातोडा

वाशिम जिल्हा न्यायालयाने पंधरा वर्षांपूर्वी कोठडीत झालेल्या एका मृत्यू प्रकरणी तत्कालीन पोलीस ठाणे प्रमुखासह नऊ पोलीस कर्मचाऱ्यांना सुनावलेली जन्मठेपेची शिक्षा हा 'खाकी'च्या क्रूरतेवर आणि मनमानी कारभारावर बसलेला एक मोठा कायदेशीर हातोडा आहे. ज्या पोलिसांवर जनतेच्या रक्षणाची आणि कायद्याचे राज्य राखण्याची जबाबदारी असते, त्यांनीच कायद्याचा रक्षक नव्हे, तर भक्षक बनावे यासारखी दुसरी दुर्दैवी गोष्ट नाही. रिसोड पोलीस ठाण्यात घडलेली ही घटना केवळ एका निरपराध व्यक्तीचा बळी घेणारी नव्हती, तर ती संपूर्ण पोलीस दलाच्या कार्यपद्धतीवर आणि संवेदनशीलतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी होती. न्यायालयाने दिलेल्या या ऐतिहासिक निकालामुळे उशिरा का होईना, पण पीडित कुटुंबाला आणि वंचित समाजाला न्याय मिळाला आहे. या प्रकरणाचे स्वरूप अत्यंत धक्कादायक आणि पोलिसांच्या गुन्हेगारी वृत्तीचे दर्शन घडवणारे आहे. पारधी समाजातील बेग्या पवार या तरुणाला रात्रीच्या अंधारात घरातून केवळ चौकशीच्या नावाखाली उचलण्यात आले. ज्या व्यक्तीवर कोणताही गुन्हा दाखल नव्हता, ज्याचे अवघ्या वर्षभरापूर्वीच लग्न झाले होते, त्याला पोलिसांनी बेदम मारहाण करून कोठडीतच मृत्यूच्या दारात ढकलले. वंचित आणि उपेक्षित समाजातील व्यक्तींना गुन्हेगारांसारखी वागणूक देणे आणि संशयाच्या नावाखाली त्यांच्यावर अमानुष अत्याचार करणे, हा खाकी वर्दीचा जुनाच आजार आहे. बेग्या पवार यांच्या शरीरावरील जखमा आणि शवविच्छेदन अहवालात समोर आलेली तुटलेली हाडे ही पोलिसांनी कोठडीत केलेल्या अमानुष छळाची क्रूर साक्ष देतात. सर्वात संतापजनक बाब म्हणजे, या मृत्यूनंतर पोलिसांनी आपल्याच खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्याला वाचवण्यासाठी दाखवलेली तत्परता होय. मुलाचा कोठडीत मृत्यू झाल्यानंतर न्यायासाठी आलेल्या हताश आई-वडिलांची तक्रार घेण्यास पोलिसांनी स्पष्ट नकार दिला; कारण त्यात त्यांच्याच पोलीस ठाणे प्रमुखाचे नाव होते. ही प्रवृत्ती लोकशाहीला आणि न्यायव्यवस्थेला आव्हान देणारी होती. जर समाजात प्रचंड मोर्चे निघाले नसते, आंदोलने झाली नसती, तर कदाचित हे प्रकरण नेहमीप्रमाणे दडपले गेले असते. सुदैवाने, या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपवण्यात आला आणि तपास अधिकाऱ्यांच्या पथकाने निष्पक्षपणे काम करून न्यायालयात सबळ पुरावे आणि आरोपपत्र दाखल केले. न्यायमूर्तींनी तत्कालीन पोलीस ठाणे प्रमुखासह आठ कर्मचाऱ्यांना दोषी ठरवून थेट जन्मठेपेची शिक्षा सुनावल्याने, पोलीस कोठडीत स्वतःला 'राजे' समजणाऱ्यांना एक कडक संदेश गेला आहे. आरोपींपैकी दोन जण सेवानिवृत्त झाले असले, तरी कायद्याच्या लांब हातांनी त्यांना सोडले नाही, ही समाधानाची बाब आहे. पोलीस कोठडीत होणारे मृत्यू (Custodial Deaths) हा आपल्या न्यायव्यवस्थेवरील एक मोठा डाग आहे. हा डाग पुसण्यासाठी केवळ कायदे असून चालत नाही, तर वाशिम न्यायालयासारख्या कठोर आणि निस्पृह निकालांची गरज असते. हा निकाल म्हणजे वर्दीच्या जोरावर गरिबांवर आणि निरपराधांवर जुलूम करणाऱ्या प्रत्येक पोलीस कर्मचाऱ्यासाठी एक कायमस्वरूपी धडा ठरावा, हीच अपेक्षा आहे.

## पाणीच नवी कृषीक्रांती घडवू शकते; जलसंधारण आणि संवर्धित सिंचनावर भर आवश्यक

### कुलगुरु प्रा. (डॉ.) इन्द्र मणि वनामकृवित सिंचन जल व्यवस्थापनावरील राष्ट्रीय द्विवार्षिक कार्यशाळेचे उद्घाटन

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी:**भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापन विभागाचे (ICAR-NRM) उपमहासंचालक डॉ. ए. के. नायक

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प (AICRP) – सिंचन जल व्यवस्थापन विभाग आणि भुवनेश्वर येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषद अंतर्गत भारतीय जल व्यवस्थापन संस्थान (IIWM – Indian Institute of Water Management) यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १ ते ३ जुलै २०२६ दरम्यान आयोजित “सिंचन जल व्यवस्थापन” विषयावरील द्विवार्षिक कार्यशाळा – २०२६ चे उद्‌घाटन दिनांक १ जुलै २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील सिंपोजियम हॉल येथे झाले.



उद्‌घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापन विभागाचे (ICAR-NRM) उपमहासंचालक डॉ. ए. के. नायक यांनी आभासी माद्यामाद्वारे सहभाग नोंदविला. व्यासपीठावर नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या मृदा व जल व्यवस्थापन विभागाचे सहाय्यक महासंचालक डॉ. वेल्मुरुगन आणि भुवनेश्वर येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषद अंतर्गत भारतीय जल व्यवस्थापन संस्थानाचे संचालक डॉ. ए. सारंगी, शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार, संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, भुवनेश्वर येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषद अंतर्गत अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प (जल व्यवस्थापन) चे प्रकल्प समन्वयक डॉ. एस. मोहंती तसेच परभणी येथील अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प (सिंचन जल व्यवस्थापन) चे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. हरीश आवारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव श्री. पुरभा काळे, नियंत्रक श्रीमती भाग्यश्री जाधव, माजी शिक्षण संचालक डॉ. उदय खोडके प्रकल्पाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एस. के. गुप्ता, डॉ. डी. के. शर्मा, डॉ. के. एन. तिवारी, डॉ. एस. डी. गोरंटीवार, जैन इरिगेशनचे श्री. बी. डी. जडे आदी मान्यवर यांच्यासह भारतातील विविध राज्यांमधील २६ संशोधन केंद्रांतील ४३ शास्त्रज्ञांनी प्रत्यक्ष उपस्थिती दर्शविली, तर २२ शास्त्रज्ञांनी आभासी माध्यमाद्वारे सहभाग नोंदविला. तसेच विद्यापीठातील सर्व महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, अभियांत्रिकी महाविद्यालयातील शास्त्रज्ञ तसेच प्रगतशील शेतकरी यांचाही या कार्यक्रमात सहभाग होता.

माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी या कार्यशाळेत देशभरातील शास्त्रज्ञ सहभागी झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. पाण्याचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी “जल बिना जीवन नहीं” असे नमूद करत, मानवी जीवन, स्वच्छता आणि संपूर्ण समाजव्यवस्थेसाठी पाणी किती अनिवार्य आहे हे स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, जसे शेतीसाठी ज्ञान आवश्यक आहे, तसेच पाण्याचेही अत्यंत महत्त्व असून या कार्यशाळेत सहभागी झालेल्या जलतज्ज्ञांमध्ये विचारमंथन होऊन सिंचनातील पाणी बचतीसाठी उपयुक्त शिफारशी पुढे येतील.

विद्यापीठामध्ये सन १९८० पासून कार्यरत असलेल्या सिंचन जल व्यवस्थापन योजनेद्वारे अनेक तंत्रज्ञान विकसित करण्यात आले असून, त्या तंत्रज्ञानाचा मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांमध्ये प्रभावी प्रसार करण्यात आला आहे. तसेच एससीएसपी (SCSP) आणि टीएसपी (TSP) कार्यक्रमांतर्गत मराठवाड्यातील १२ गावांमध्ये पथदर्शी कार्यक्रम राबवून हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले आहे.

विद्यापीठाने चार वर्षांपूर्वी “शेतकरी देवो भवः” हा नारा दिला होता आणि त्याच भावनेतून सातत्याने कार्य सुरू आहे. आजच्या या राष्ट्रीय कार्यक्रमात देखील शेतकऱ्यांना विशेष आमंत्रित करून त्यांचा सन्मान करण्यात आला असून, त्यांच्या अनुभव, विचार आणि सल्ल्यांची नोंद या कार्यशाळेच्या चर्चेत व्हावी, असे आवाहन त्यांनी केले.

जलसिंचन संशोधनासह विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय कृषी अनुसंधान परिषद (ICAR) आणि महाराष्ट्र शासन सातत्याने प्रोत्साहन व अनुदान उपलब्ध करून देत असल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. पुढे ते म्हणाले की, पाण्याच्या बचतीसाठी पाण्याचा संचय, संवर्धन आणि न्यायिक वापर (Collect, Conserve and Judicial Use of Water) अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याच दृष्टीने विद्यापीठाने ९ कोटी लिटर क्षमतेचे अमृत सरोवर (शेततळे) निर्माण केले असून, भविष्यात २६ कोटी लिटर जलसंचयाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मराठवाड्यातील सुमारे ८० टक्के शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असून अनेकदा दुबार पेरणीचे संकट निर्माण होते. यासाठी विविध तंत्रज्ञान विकसित करण्यात आले असले तरी अजून अनेक बाबींवर काम करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने “त्रिशूल तंत्रज्ञान” विकसित केले असून, त्यामध्ये शेततळे, सूक्ष्म सिंचन आणि सौरऊर्जेचा वापर यांचा समावेश आहे. याद्वारे विद्यापीठाच्या मध्यवर्ती प्रक्षेत्रावर तसेच बदनापूर येथील प्रक्षेत्रावर प्रात्यक्षिकांद्वारे पाण्याचे महत्त्व प्रभावीपणे दाखवून देण्यात आले आहे.

शास्त्रज्ञांनी विकसित केलेल्या तंत्रज्ञानाला संबंधित राज्य शासनाची मान्यता मिळणे आवश्यक असते. त्यानंतरच त्या तंत्रज्ञानाचा शासनाच्या योजनांमध्ये समावेश होऊ शकतो, हे शेततळ्याच्या उदाहरणातून स्पष्ट झाले आहे. पाण्याच्या व्यवस्थापनासाठी केवळ कृषि अभियंत्यांचे कार्य महत्त्वाचे नसून बीज पैदास तज्ज्ञांसह सर्व संबंधित शाखांचे योगदान तितकेच आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यापीठाच्या गोदावरी तूर वाणाच्या विकासाद्वारे विद्यापीठाने हे सिद्ध करून दाखवले आहे.

देशातील जवळपास ८० टक्के पाण्याचा वापर शेतीसाठी होतो. हा वापर कमी करण्यासाठी पीक पद्धतीत बदल करणे आणि आवश्यक आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे आहे. महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री उत्पादन वाढीसाठी तसेच सिंचन क्षेत्र विस्तारासाठी सातत्याने संवर्धित सिंचनाचा आग्रह धरत आहेत.

देशाने ५० मिलियन टनांवरून ३७६ मिलियन टन कृषी उत्पादनापर्यंत मोठी झेप घेतली असून, यात संवर्धित सिंचनाचा व्यापक वापर झाल्यास उत्पादनात आणखी मोठी वाढ निश्चित होईल. महाराष्ट्रातून संपूर्ण देशाला दिशादर्शक ठरणारे शेती तंत्रज्ञान दिले जात असून, या कार्यशाळेतून भविष्यासाठी उपयुक्त आणि परिणामकारक शिफारशी पुढे याव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यासोबतच शिक्षण संस्था, उद्योग क्षेत्र आणि शासन म्हणजेच Academia – Industry – Government या त्रिस्तरीय समन्वयाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. “पाणीच नवी क्रांती घडवू शकते” असे नमूद करत, कोणतेही तंत्रज्ञान विकसित करताना त्याद्वारे पाण्याची बचत कशी साधता येईल याचा विचार प्रत्येक शास्त्रज्ञाने करावा, असे आवाहन त्यांनी केले.

उपमहासंचालक डॉ. ए. के. नायक म्हणाले की, सिंचन जल व्यवस्थापनासाठी पाण्याचा काटेकोर व कार्यक्षम वापर होण्याच्या दृष्टीने स्पष्ट ध्येय आणि उद्दिष्टे निश्चित करून योग्य कार्यक्रमांची आखणी करणे आवश्यक आहे. याच्या माध्यमातून पुढील पाच वर्षांतील संभाव्य परिणाम आणि मिळणारे लाभ यासंदर्भातील योग्य दस्तऐवज तयार करण्यात यावेत, ज्याचा उपयोग प्रभावी नियोजनासाठी करता येईल.

त्यांनी सांगितले की, केवळ मागील पाच वर्षांतील नव्हे तर प्रकल्प सुरू झाल्यापासून झालेल्या सर्व महत्त्वपूर्ण यशस्वी कामगिरीची नोंद घेणे आवश्यक आहे. तसेच भारतातील सर्व केंद्रांच्या कार्याचे मूल्यांकन करण्यात यावे आणि उल्लेखनीय कार्य करणाऱ्या केंद्रांना प्रोत्साहन देण्यात यावे.

याबरोबरच विकसित तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांमध्ये झालेल्या सकारात्मक बदलांचे प्रात्यक्षिकरण करावे. या कार्यशाळेतील चर्चेमधून योग्य नियोजन आणि प्रभावी शिफारसी समोर याव्यात. तसेच जिल्हास्तरावर जलसिंचन नियोजनासाठी सखोल चर्चा व्हावी. जलआधारित आर्थिक नियोजन आणि पीक नियोजनाला प्राधान्य देण्यात यावे. विशेषतः कोरडवाहू क्षेत्रामध्ये जमिनीतील उपलब्ध पाण्याचा विचार करून पीक नियोजन निश्चित करावे आणि पुढील पाच वर्षांसाठी सक्षम व परिणामकारक असा आराखडा तयार करावा, असे त्यांनी सूचित केले.

यावेळी सहाय्यक महासंचालक डॉ. वेल्मुरुगन यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, शाश्वत शेतीसाठी तंत्रज्ञानाधारित कार्यपद्धती तसेच हवामान अनुकूल तंत्रज्ञानाची आज नितांत गरज आहे. हवामान बदल ही जागतिक पातळीवरील गंभीर बाब असून त्यासोबत अनेक समस्या जोडलेल्या आहेत. या पार्श्वभूमीवर योग्य नियोजन करणे अत्यावश्यक आहे. तसेच सिंचनाच्या पायाभूत सुविधा वाढवून पाण्याचा काटेकोर व कार्यक्षम वापर करणे गरजेचे आहे. पाण्याचे घरगुती, औद्योगिक आणि कृषी अशा विविध क्षेत्रांमध्ये बहुविध उपयोग होत असून त्याचा वापर करणारे अनेक घटक (Stakeholders) आहेत. पाण्याची वाढती मागणी आणि उपलब्धतेवरील ताण या सर्व आव्हानांवर मात करण्यासाठी अथवा त्यांची तीव्रता कमी करण्यासाठी या कार्यशाळेत सखोल चर्चा व्हावी, असे त्यांनी नमूद केले.

विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. खिजर बेग यांनी स्वागतपर भाषणात विद्यापीठामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध संशोधन कार्यांचा आढावा सादर केला.

भुवनेश्वर येथील संचालक डॉ. ए. सारंगी यांनी अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्पाच्या भुवनेश्वर येथील मुख्य कार्यालयासह देशातील २६ केंद्रांवर सुरू असलेल्या विविध संशोधन कार्याची माहिती दिली.

उद्‌घाटन समारंभादरम्यान माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या हस्ते उपस्थित मान्यवर तसेच शेतकरी प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला. याचप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते वार्षिक अहवाल तसेच देशातील विविध ठिकाणच्या शास्त्रज्ञांनी लिखित विविध प्रकाशनांचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. हरीश आवारी यांनी केले, तर सूत्रसंचालन उप संचालक संशोधन डॉ. सुनिता पवार यांनी केले.

कार्यशाळेत देशभरातील अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्पांतर्गत सिंचन जल व्यवस्थापन केंद्रांतील शास्त्रज्ञ सिंचन जल व्यवस्थापन, सूक्ष्म सिंचन, जलसंधारण, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवरील जल नियोजन तसेच शाश्वत शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान या विषयांवर चर्चा व अनुभवांची देवाणघेवाण करणार आहेत. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकल्प समन्वयक डॉ. एस. मोहंती तसेच परभणी येथील सिंचन जल व्यवस्थापनचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. हरीश आवारी यांनी सर्व संबंधितांचे सहकार्य लाभत असल्याचे सांगितले.

नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या मृदा व जल व्यवस्थापन विभागाचे सहाय्यक महासंचालक डॉ. वेल्मुरुगन भुवनेश्वर येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषद अंतर्गत भारतीय जल व्यवस्थापन संस्थानाचे संचालक डॉ. ए. सारंगी संशोधन संचालक डॉ. खिजर बेग सिंचन जल व्यवस्थापनचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. हरीश आवारी उप संचालक संशोधन डॉ. सुनिता पवार.

## मनमानी पणाने सिंगल युज वापर करणाऱ्या व्यापाऱ्यांना ठोठावला दंड

### परभणीत 55 किलो प्लास्टिक जप्त



हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी

**परभणी:** सिंगल युज प्लास्टिक वापर करणाऱ्या व्यापाऱ्यावर शहर महापालिकेच्या दंडात्मक कारवाई करत जुना मोंढा परिसरात तपासणी करिता गेले असताना तेथील तीन दुकानदारांना 25 हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे त्यांच्या जवळील ग्राहकासाठी वापरण्यात येणारे 55 किलो सिंगल युज प्लास्टिक महापालिकेच्या पथकाने जप्त केले.

महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर उपायुक्त प्रज्ञावंत कांबळे तुकाराम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार दिनांक 2 जुलै रोजी जुना मोंढा परिसरातील सिंगल युज प्लास्टिकच्या विरोधात मोठी विशेष तपासणी मोहीम राबवण्यात आली होती या मोहिमेत मुख्य स्वच्छता अधिकारी कारण गायकवाड विनय ठाकूर तुराब खान न्याय रत्न घुगे राजू झोडपे सौरभ सूर्यवंशी यांच्या पथकाने सहभाग घेतला होता सदर पथकाने 37 दुकानाची तपासणी केली यामध्ये तीन दुकानात सिंगल युज प्लास्टिक आढळून आले. यापैकी दोन दुकानावर यापूर्वी कार्यवाही करण्यात आली होती त्यामुळे त्यांना प्रत्येकी दहा दहा हजाराचा दंड आकारण्यात आला तसेच दुसऱ्या एका दुकानदाराला 5000 चा दंड करण्यात आला या मोहिमेत एकूण 25000 चा दंड वसुली करण्यात आली आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना – 2026

### कर्जमुक्तीकडून आत्मनिर्भर तिकडे... बळीराजासाठी नवी आशा

"जय जवान, जय किसान" या विचाराचा खरा अर्थ साकार करणारा अन्नदाता शेतकरी देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. स्वतःच्या कष्टाने तो संपूर्ण समाजाचे अन्नसुरक्षेचे दायित्व सांभाळतो. मात्र, निसर्गाची अनिश्चितता, वाढता उत्पादन खर्च, बाजारभावातील चढ-उतार आणि आर्थिक संकटांमुळे अनेक शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबले जातात. अशा परिस्थितीत महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेली 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना – २०२६' ही लाखो शेतकरी कुटुंबांसाठी दिलासादायक ठरणार आहे.

यंदा १ जुलै कृषी दिन, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि हरितक्रांतीचे प्रणेते स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त ही योजना प्रत्यक्षात राबविण्यास सुरुवात होत आहे. कृषी विकासासाठी त्यांनी दिलेल्या दूरदृष्टीपूर्ण योगदानाला ही योजना एक प्रकारे अभिवादन करणारी ठरेल.

या योजनेअंतर्गत जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा होण्यास प्रारंभ होणार आहे. त्यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, नव्या उत्साहाने शेती करण्याचा आत्मविश्वास निर्माण होईल.

योजनेनुसार पात्र थकबाकीदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीककर्जाची कर्जमुक्ती देण्यात येणार आहे. दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता (ओटीएस) योजना राबविण्यात आली आहे. विशेष म्हणजे, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे प्रामाणिकपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही शासनाकडून प्रोत्साहन मिळणार आहे.

योजनेची संपूर्ण प्रक्रिया आधार क्रमांकावर आधारित आणि ऑनलाइन ठेवण्यात आली आहे. महाआयटीच्या माध्यमातून लाभार्थ्यांची संगणकीय पडताळणी करण्यात येणार असून, पात्र लाभार्थ्यांच्या याद्या ग्रामपंचायत, संबंधित बँका, आपले सरकार सेवा केंद्र तसेच गाव चावडीवर प्रसिद्ध केल्या जातील. मोबाईल संदेशाद्वारे लाभार्थ्यांना माहिती देण्याची व्यवस्था करण्यात आल्याने पारदर्शकता आणि सुलभता अधिक वाढणार आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी वेळेत आधार प्रमाणीकरण पूर्ण करणे आवश्यक आहे. ओटीएस योजनेतील लाभार्थ्यांनी शासनाचा लाभ मिळण्यापूर्वी स्वतःचा हिस्सा जमा करणे बंधनकारक राहील. तसेच अंमलबजावणीदरम्यान उद्भवणाऱ्या अडचणींचे तातडीने निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर तक्रार निवारण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित नाही. कर्जमुक्त झालेला शेतकरी पुन्हा बँकांकडून पीककर्ज घेऊ शकतो, आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करू शकतो, सिंचन व यांत्रिकीकरणासाठी गुंतवणूक करू शकतो. त्यामुळे कृषी उत्पादन वाढण्याबरोबरच ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही नवसंजीवनी मिळणार आहे.

शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला तर शेती सक्षम होईल आणि शेती सक्षम झाली तर राज्य व देशाची अर्थव्यवस्था अधिक बळकट होईल. त्यामुळे 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना – २०२६' ही केवळ कर्जमुक्तीची योजना नसून, बळीराजाला आत्मनिर्भरतेकडे नेणारे आणि ग्रामीण विकासाला नवी दिशा देणारे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

**संकलन :** विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

■

## पाक गुप्तचर संस्था 'ISI' च्या नेटवर्कला मदत करणारा एजंट छत्रपती संभाजीनगरातून ताब्यात!

**पान 1 वरून ->**

आयएसआयच्या हँडलरला पुरवल्याचा गंभीर आरोप आहे. याच तपासादरम्यान रफीक शेखचे नाव समोर आले. सीआयडी इंटेलिजन्सचे अतिरिक्त महासंचालक प्रफुल्ल कुमार यांनी सांगितले की, बँक खाती आणि आर्थिक व्यवहारांच्या तपासात अनेक महत्त्वाचे धागेदोरे हाती लागले आहेत. या नेटवर्कची व्याप्ती किती मोठी आहे आणि यात आणखी कोणाचा समावेश आहे, हे शोधण्यासाठी रफीकचा मोबाईल, सोशल मीडिया प्रोफाइल्स आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांची फॉरेन्सिक तपासणी केली जात आहे. आगामी चौकशीत अनेक मोठे खुलासे होण्याची शक्यता आहे.

## आकाशवाणी परिसरात भंगार व्यावसायिकाची क्रूर हत्या, हल्लेखोरांच्या शोधासाठी चार पथके रवाना

**पान 1 वरून ->**

२ वाजण्याच्या सुमारास ते बाहेरगावून शहरात परतले. जालना रोडवरील एस.एफ.एस. शाळेपुढे रिक्षातून उतरल्यानंतर ते जिन्सीच्या दिशेने पायी जात होते. याचवेळी पंचम बारसमोर दोन अज्ञात गुंडांनी त्यांना अडवले. अंधाराचा फायदा घेऊन हल्लेखोरांनी त्यांना रस्त्याच्या कडेला ओढत नेऊन मारहाण सुरू केली. अब्दुल बाशिद यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता, एका हल्लेखोराने त्यांच्या मांडीत धारदार चाकूने सपासप वार केले. चाकूच्या वारांमुळे मांडीतील मुख्य रक्तवाहिनी कापली गेल्याने अब्दुल बाशिद गंभीर जखमी झाले. या रक्तबंबाळ अवस्थेतच त्यांनी रस्त्यावर धावत येत एका रिक्षाचालकाकडे वाचवण्यासाठी आर्त मदत मागितली. मात्र, अंगावरून होणारा प्रचंड रक्तस्त्राव पाहून तो रिक्षाचालक घाबरला आणि त्यांना मदत न करताच तिथून निघून गेला. दरम्यान, सुदैवाने शहरात रात्रगस्तीवर असलेल्या पोलिसांच्या ‘डायल ११२’ च्या कर्मचाऱ्यांनी रक्ताच्या थारोळ्यातील व्यक्ती पाहून तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी वेळ न गमावता अब्दुल बाशिद यांना दुसऱ्या एका रिक्षात टाकून शासकीय घाटी रुग्णालयात दाखल केले. मात्र, शरीरातून प्रचंड रक्तस्त्राव झाल्यामुळे उपचार सुरू असतानाच पहाटेच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. अब्दुल बाशिद हे रुग्णालयात दाखल करेपर्यंत पूर्णपणे शुद्धीवर होते. शासकीय रुग्णालयात जात असताना त्यांनी रिक्षाचालकाला आपल्या मोठ्या मुलाचा मोबाईल क्रमांक तोंडी सांगून घटनेची माहिती देण्यास सांगितले होते. माहिती मिळताच त्यांच्या मुलाने आणि भावाने घाटीत धाव घेतली, मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. हल्लेखोरांनी अब्दुल बाशिद यांच्याकडील मोठी रक्कम लुटण्याच्या उद्देशातूनच हा हल्ला केला असावा, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. हल्लेखोरांनी घाईघाईत त्यांचा मोबाईल चोरला, मात्र खिशातील ५०० रुपयांची नोट तशीच मिळून आली.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात करिअर संसद स्थापना व शपथविधी उत्साहात संपन्न




हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

**सोयगाव,दि.२ जुलै :** अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव तसेच करिअर कट्टा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर संसद स्थापना व शपथविधी कार्यक्रम सोमवार,दि.२९ जून २०२६ रोजी सकाळी करिअर कट्टा अभ्यासिकेत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.कार्यक्रमात करिअर संसदेच्या नव्याने निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांना शपथ देण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण,संघटन कौशल्य,सामाजिक जबाबदारीची जाणीव तसेच करिअरविषयक जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,कार्यालयीन अधीक्षक पंकज साबळे,करिअर कट्टा समन्वयक डॉ.मनोज कुमार चोपडे व डॉ.संतोष पडघन यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना जबाबदारीची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे आयोजन करिअर कट्टा विभागामार्फत यशस्वीरीत्या करण्यात आले.

# आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी परभणी जिल्हा प्रशासन सज्ज!

## परभणी जिल्ह्यातून त्रेचाळीस दिंड्यांचे होणार मार्गक्रमण; वारकऱ्यांना सर्व मूलभूत सुविधा पुरवण्याचे प्रशासनाचे आदेश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**परभणी :** आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर परभणी जिल्हा प्रशासनाने वारकऱ्यांच्या सुरक्षित, सुखकर आणि सुविधायुक्त प्रवासासाठी व्यापक नियोजन केले आहे. जिल्हाधिकारी नतिशा माथुर यांच्या मार्गदर्शनानुसार निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांनी विविध विभागांना समन्वयाने काम करून वारकऱ्यांना आवश्यक सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे आदेश जारी केले आहेत. या नियोजनाचा भाग म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व प्रमुख विभागप्रमुखांची एक महत्त्वाची आढावा बैठक संपन्न झाली.



या वारी दरम्यान जिल्ह्यातून तसेच जिल्ह्याबाहेरून पंढरपूरकडे जाणाऱ्या सुमारे त्रेचाळीस दिंड्या परभणी जिल्ह्यातून मार्गक्रमण करणार आहेत. जुलै महिन्याच्या सुरुवातीच्या आठवड्यापासूनच या प्रमुख दिंड्या परभणी जिल्ह्यात दाखल होणार असून, जुलैच्या मध्यापर्यंत विविध दिंड्यांचे आगमन सुरूच राहणार आहे. या काळात श्रीक्षेत्र त्रिधारा, रोकड हनुमान मंदिर (नवा मोंढा), परभणी, दैठणा आणि गंगाखेड या प्रमुख ठिकाणी वारकऱ्यांच्या मुक्कामाची जय्यत व्यवस्था प्रशासनाकडून करण्यात येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने श्री संत गजानन महाराज (शेगाव), श्री संत गुलाबराव महाराज (चांदूर बाजार) तसेच श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थान (कौंडिण्यपूर-तिवसा) यांच्या पालख्या परभणी जिल्ह्यातून जाणार असून त्यांच्या स्वागतासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

जिल्हा प्रशासनाच्या आदेशानुसार पोलीस, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, जिल्हा परिषद, महापालिका, महावितरण, परिवहन, अन्न व औषध प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन आणि महसूल आदी सर्व यंत्रणांना स्वतंत्र जबाबदाऱ्या निश्चित करून देण्यात आल्या आहेत. पालखी सोहळा सुरक्षितपणे पार पडण्यासाठी दिंडी मार्गावर कडक पोलीस बंदोबस्त व वाहतूक नियोजन केले जाईल. मुक्कामस्थळी स्वच्छ पिण्याचे पाणी, निवारा आणि वॉटरप्रूफ तंबू उभारले जाणार असून महिला वारकऱ्यांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे व आंघोळीची व्यवस्था असेल. याशिवाय फिरती आरोग्य पथके, चोवीस तास रुग्णवाहिका, डॉक्टर व औषधांची उपलब्धता सुनिश्चित करण्यात आली आहे.

वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी डास प्रतिबंधक फवारणी, स्वच्छता मोहीम आणि साथीच्या रोगांवर नियंत्रणासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दिंडी मार्गावरील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून खड्डे बुजवले जात आहेत. महावितरणकडून आवश्यक ठिकाणी अखंडित वीजपुरवठा आणि तात्पुरती वीज जोडणी दिली जाणार आहे. एसटी महामंडळाकडून भाविकांसाठी विशेष बसची सुविधा उपलब्ध करण्यात येणार असून, अन्न व पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेची नियमित तपासणी केली जाईल. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी चोवीस तास कार्यरत असणारा नियंत्रण कक्ष आणि आपत्ती व्यवस्थापन पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत. सुरक्षित आणि सुविधायुक्त वारी घडवून आणण्यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखून काम करावे, असे निर्देश प्रशासनाने दिले आहेत.

## क्युरियस किड्स अँड सह्याद्री अकॅडमीमध्ये डॉक्टर्स दिन साजरा



**जिंतूर :** शहरातील शिवाजीनगर येथील क्युरियस किड्स अँड सह्याद्री अकॅडमीमध्ये डॉक्टर्स दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांसाठी हॉस्पिटलचा आकर्षक देखावा उभारण्यात आला होता. या उपक्रमात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी डॉक्टर, नर्स, फार्मासिस्ट आणि रुग्ण यांच्या भूमिका साकारत आरोग्यसेवेचे महत्त्व प्रभावीपणे उलगडून दाखविले. विद्यार्थ्यांना जंक फूडचे दुष्परिणाम समजावून सांगत सकस व संतुलित आहाराचे महत्त्व पटवून देण्यात आले. तसेच नियमित व्यायाम आणि निरोगी जीवनशैलीचा संदेशही देण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान अग्निहोत्री मॅडम यांनी डॉक्टर्स डे निमित्त विशेष गीत सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी चंदू प्रधान सर, धनंजय देशमुख सर, स्कूल इन्चार्ज भराडे मॅडम, कदम मॅडम, बांडे मॅडम, घुगे मॅडम, अंभोरे मॅडम तसेच शेख सर यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमाबद्दल संस्थेचे संचालक राहुल प्रधान सर, अजय सोनवणे सर, प्रशांत तायडे सर आणि संजय माहुरकर सर यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उपक्रमशीलतेचे कौतुक केले.

## भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा अमृत महोत्सवी वर्धापन दिन साजरा

**जिंतूर :** दि २८ जून २०२६ रोजी श्री संचारेश्वर प्राथमिक विद्यालय जिंतूर येथे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा ७५ वा वर्धापन दिन संस्थेच्या प्रांगणात उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे पदाधिकारी,शिक्षक,विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे स्थानिक अध्यक्ष महालिंगआप्पा कुरे यांच्या हस्ते संस्था ध्वजाचे ध्वजारोहणाने झाली.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक विवेक मुक्कावार यांनी केले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा स्थानिक कार्यवाह रविकुमार पेशकार यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेतला. आणि शिक्षणाचे महत्व सांगितले. ते म्हणाले, "भारतीय शिक्षण प्रसारक संस्था नेहमीच गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रयत्नशील आहे. संस्थेने आतापर्यंत हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात ज्ञानाचा प्रकाश पोहोचवला आहे." आणि हे ईश्वरी कार्य ईथुन पुढे ही असेच अविरत सुरू राहील.असे मत व्यक्त केले.

मुख्याध्यापिका श्रीमती सुमती भारती यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

याप्रसंगी अध्यक्ष म्हणून महालिंगआप्पा कुरे,तर प्रमुख पाहुणे कार्यवाह रवीकुमार पेशकार,उपाध्यक्ष किरणजी वट्टमवार, सरस्वती विद्यालयाचे अध्यक्ष हनुमंतजी भालेराव,शालेय समिती अध्यक्ष वसंतराव पुराणीक, भास्करराव अंबरवाडीकर, विभाग सहकार्यवाह उपेंद्र कौडगावकर, तालुका संघचालक सुरेशकाका ठोंबरे, उल्हासजी जिंतूरकर, प्रसादजी खेर्डेकर,ललितजी देव,चंद्रकांत वसेकर,सौ.मीराताई खापरखुंटीकर, सौ.संगीताताई जिंतूरकर,प्राथमिक मुख्याध्यापिका सुमती भारती, माध्यमिक मुख्याध्यापक प्रभाकर नांदेडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब ठोंबरे यांनी केले तर आभार प्रदर्शन मोनिका घोडके यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्कार केंद्रातील सर्व शिक्षक वृंद शिवाजी सोमोसे,किरण नाईक,उषा खराबे,रुपाली सोनसळे, बाळासाहेब ठोंबरे,विवेक मुक्कावार, प्रल्हाद वैरागर,कृष्णा मुसळे,गजानन घुगे,कपिल घुगे,दिनकर चिलगर,अंजली ठोंबरे,मनिषा धाबेवार, अश्विनी पांडे,मोनिका घोडके व शिक्षकेतर कर्मचारी पुजा बुधवंत,परिश्रम घेतले.

## श्रीक्षेत्र सिमूर गव्हाण येथे जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराजांच्या त्रैदिवसीय दर्शन व समस्या मार्गदर्शन सोहळ्याचे आयोजन!

### अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमांतर्गत भव्य सोहळा



**परभणी :** जगदगुरू रामानंदाचार्य दक्षिण पीठ, नाणीजधाम (रत्नागिरी) चे जगदगुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांचा तीन दिवसीय भव्य समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळा परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यातील श्रीक्षेत्र सिमूर गव्हाण येथील मराठवाडा उपपीठात आयोजित करण्यात आला आहे. जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज (ज.न.म.) संस्थानाच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमांतर्गत या मंगल सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून सकाळी नऊ वाजल्यापासून हा कार्यक्रम सुरू होईल.

या संस्थानाच्या वतीने समाजात अनेक मोठे सामाजिक व लोकोपयोगी उपक्रम राबविले जातात. यामध्ये प्रामुख्याने ग्रामस्वच्छता अभियान, इंग्रजी माध्यमाची मोफत शाळा, मुले व मुलींसाठी मोफत वेदपाठ शाळा, मोफत दवाखाना, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे पुनर्वसन आणि महिला सक्षमीकरणांतर्गत मोफत शिलाई यंत्र व घरघंटी वाटप केले जाते. यासोबतच कायदेविषयक साक्षरता शिबिरे, व्यसनमुक्ती, वनराई बंधारे, पशु-पक्षांसाठी जलसेवा आणि आपत्कालीन मदत उपक्रमही राबवले जातात.

संस्थानाच्या वतीने राबवण्यात आलेल्या रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून अवघ्या पंधरा दिवसांमध्ये तब्बल पावणेदोन लाखांच्या जवळ (१,७१,१५०) रक्त कुपिकांचे संकलन करून ते महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र रक्त संक्रमण परिषदेला सुपूर्द करण्यात आले होते. तसेच वृक्षारोपण उपक्रमांतर्गत एक लाखापेक्षा जास्त (१,१०,६८७) झाडे लावण्यात आली आहेत. महामार्गावरील अपघातग्रस्तांसाठी राज्यातील सहा राष्ट्रीय महामार्गांवर संस्थानाच्या त्रेपन्न (५३) रुग्णवाहिका अहोरात्र विनामूल्य सेवा देत असून, आतापर्यंत हजारो जखमींचे प्राण वाचवण्यात यश आले आहे. संस्थानाच्या विशेष उपक्रमांतर्गत गरजूंना थेट रुग्णालयात जाऊन रक्त पुरवले जाते, ज्याचा लाभ हजारो रुग्णांना झाला आहे. याशिवाय सामाजिक बांधीलकी म्हणून मरणोत्तर देहदान आणि अवयवदान करून ते शासकीय मेडिकल कॉलेजना सुपूर्द केले जातात.

या भव्य कार्यक्रमात पहिल्या दिवशी साधक दीक्षा आणि दुसऱ्या दिवशी उपासक दीक्षा कार्यक्रम संपन्न होणार आहे. तरी मराठवाडा उपपीठांतर्गत येणाऱ्या सर्व जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक, साधक, शिष्य आणि हितचिंतकांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त भाविकांनी उपासक आणि साधक दीक्षेसाठी आपली नोंदणी करावी. सोहळ्यासाठी येणाऱ्या सर्व भाविकांसाठी तिन्ही दिवस महाप्रसादाची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. या महंमंगल समयी सर्वांनी सहकुटुंब उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पीठ प्रमुख श्री जयप्रकाश लोणारी, सहप्रमुख श्री विजय देशपांडे, व्यवस्थापक श्री सुरेश मोरे, मराठवाडा पीठ समिती व सर्व जिल्हा सेवा अध्यक्षांच्या वतीने करण्यात आले आहे.

## का. क. मंडळ वर्धापन दिनात 'स्वरधारां' नी रसिक चिंब


**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ विभागीय कार्यालयातर्फे कामगार कल्याण मंडळाच्या ७३ व्या वर्धापन दिनानिमित्त स्वागत समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रम बुधवारी, १ जुलै रोजी उस्मानपुऱ्यातील ललित कला भवनमध्ये उत्साहात पार पडला. याप्रसंगी निर्माता-संगीतकार मंगलसिंग सोळंके प्रस्तुत 'स्वरधारा' संगीत रजनीने रसिकांची मने जिंकली. कामगार कल्याण मंडळ कामगार कुटुंबीयांचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विकासाचे उद्दिष्ट्य ठेवून विविध कल्याणकारी योजना व उपक्रमांच्या माध्यमातून कामगार व कामगार कुटुंबियांच्या उत्कर्ष करण्यासाठी कार्यरत आहे. कार्यक्रमाची सुरुवात माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. याप्रसंगी कामगार कल्याण मंडळाचे मराठवाडा विभागीय सहायक कल्याण आयुक्त भालचंद्र जगदाळे, माजी मंडळ सदस्य मतीन अहमद , लेखाधिकारी भगवान जरारे यांची प्रमुख उपस्थिती होती.


याप्रसंगी राजकीय सामाजिक सांस्कृतिक व औद्योगिक क्षेत्रातील मान्यवरांनी भेटी देऊन शुभेच्छा दिल्या. नगरसेवक नवीन ओबेराय, सतीश जाधव, शिवाजी शिंदे सत्यविजय देशमुख, पी. एस. गुजर, भानुदास शेवाळे, गणेश घाडगे, सीताराम राऊत, श्याम काथार, अनिल काळे, राकेश भालेराव, मंदा व्यवहारे, त्रिवेणी कांबळे, प्रभास जाधव, प्रथमेश देठे, अनुज चव्हाण, प्रथमेश देठे, संतोष देशमुख, नितीन निंभोरकर, रामनाथ ठेंगडे आदी उपस्थित होती. सूत्रसंचलन कल्याण निरीक्षक विजय अहिरे यांनी, केंद्र संचालक जीज्ञेश पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागीय कार्यालय तसेच गट कार्यालयअंतर्गत सर्व कामगार कल्याण केंद्रांतील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## जालना येथे गणाचार्य विरागसागरजी महाराजांच्या तृतीय समाधी दिनानिमित्त भव्य महामहोत्सव

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** बुंदेलखंडचे प्रथमाचार्य, भारत गौरव, श्रेष्ठ समाधी साधक परमपूज्य गणाचार्य श्री १०८ विरागसागरजी महामुनिराज यांच्या तृतीय समाधी दिनानिमित्त शनिवार (दि. ४ जुलै) रोजी जालना येथील विराग अक्षय समाधी तीर्थ, देवमूर्ती येथे भव्य महामहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास परमपूज्य आचार्य श्री १०८ विनम्रसागरजी महामुनिराज (२० पिच्छी ससंघ) यांचे मंगल





सान्निध्य लाभणार असून, त्यांच्या उपस्थितीत विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत.

महामहोत्सवाची सुरुवात सकाळी ६ वाजता जिनाभिषेक व शांतिधाराने होईल. त्यानंतर गुरुचरणाभिषेक, आचार्य परमेष्ठी विधान, आहारचर्या आणि दुपारी १.३० वाजता गुरु गुणानुवाद सभेत गणाचार्य विरागसागरजी महाराज यांच्या तप, त्याग, संयम व आध्यात्मिक कार्याला श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे. सायंकाळी लघुनाटिका व भव्य भजन संध्येचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला माजी न्यायमूर्ती कैलासचंदजी चांदीवाल, महावीरजी पाटणी, फुलचंदजी जैन आणि भूषणजी कासलीवाल हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांसाठी निवास, भोजन तसेच विशेष वाहन व्यवस्था करण्यात आली आहे. श्रेयांसनाथ दिगंबर जैन मंदिर समिती, विराग अक्षय समाधी तीर्थ आणि सकल दिगंबर जैन समाज, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने हा महामहोत्सव आयोजित करण्यात आला असून, राज्यभरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रचार-प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी केले आहे.

## नवगाव केंद्राचे नवनियुक्त केंद्रप्रमुख अब्दुल्लाह यांचा सत्कार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**शिवना, दि. 02 जुलै :** पैठण तालुक्यातील नवगाव केंद्राचे नवनियुक्त केंद्रप्रमुख श्री. अब्दुल्लाह सर यांचा आज दि. 02/07/2026 रोजी शिवना केंद्राच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या नियुक्तीबद्दल अभिनंदन करत पुढील शैक्षणिक व प्रशासकीय वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.



या सत्कार समारंभास केंद्रप्रमुख मा. श्री. भोंबे सर, केंद्रीय मुख्याध्यापक श्री. रोहिले सर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिवना वाडीचे मुख्याध्यापक श्री. पाटील सर तसेच जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा शिवनाचे मुख्याध्यापक श्री. मोहम्मद सादी सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांनी श्री. अब्दुल्लाह सर यांचा पुष्पगुच्छ व शाल देऊन सन्मान केला. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत, त्यांच्या नेतृत्वाखाली नवगाव केंद्रात शैक्षणिक गुणवत्ता, नाविन्यपूर्ण उपक्रम, शिक्षकांमधील समन्वय आणि विद्यार्थीहिताच्या विविध योजनांना अधिक चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

सत्काराला उत्तर देताना श्री. अब्दुल्लाह सर यांनी व्यक्त केले की, केंद्रप्रमुख म्हणून मिळालेली जबाबदारी ही केवळ पदाची नसून शिक्षणाच्या सर्वांगीण विकासाची आहे. सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, पालक आणि स्थानिक प्रशासन यांच्या सहकार्याने केंद्रातील प्रत्येक शाळेच्या गुणवत्तावाढीसाठी व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित सर्व मान्यवरांनी श्री. अब्दुल्लाह सर यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत, त्यांच्या कार्यकाळात नवगाव केंद्र शिक्षण क्षेत्रात आदर्श ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. संपूर्ण कार्यक्रम आनंददायी व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

## नाट्यपंढरी सोयगाव नगरीमध्ये पंढरीला जाणाऱ्या वारकऱ्यांचे भव्य स्वागत



हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.२ जुलै :** खान्देश-जळगाव येथून सद्गुरू झेंडूजी महाराज बेडीकर जळगाव जिल्ह्यातील यांची १९३ वर्षापासून सुरू असलेली पंढरीची पायी वारी दिंडी रामकृष्णहरी च्या जय घोषात सोयगाव नाट्य पंढरी येथे गुरुवार रोजी दाखल झाली.यावेळी समाज प्रबोधनकार विष्णू विनायकराव मापारी यांनी दिंडीचे स्वागत केले. सर्व वारकऱ्यासह हरिभक्त परायण गुरुवर्य भरत महाराज यांचे स्वागत केले.यावेळी रमेश रोकडे,आरोग्य दूत दिगंबर वाघ व हनुमान मित्र मंडळाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.दिंडी सोयगाव मुक्कामी असून उद्या दिंडीतील वारकऱ्यांची पावले पंढरीच्या दिशेने चालू लागतील. दिंडीमुळे सोयगावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

## वैजापूर येथील नवीन उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे कामकाज सुरु

छत्रपती संभाजीनगर, दि.२ (जिमाका)- वैजापुर येथे नवीन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय स्थापन झाले असून या कार्यालयाचे नियमित कामकाज गट क्रमांक ७६, तळमजला,बीएसएनएल बिल्डिंग, तालुका वैजापुर येथे सुरु झाले आहे असे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संदीप निमसे यांनी कळविले आहे. नागरिकांनी आपल्या आवश्यक शासकीय सेवा, वाहन नोंदणी, वाहन हस्तांतरण, कर भरणा, प्रवाने, लायसन्स, लायसन्स नुतनीकरण इ. आवश्यक सेवांसंबंधी कामकाजासाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयाशी संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

कार्यालयाचा पत्ता : उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, वैजापूर, गट क्रमांक ७६, तळमजला, बीएसएनएल बिल्डिंग ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर-४२३७०१. दुरध्वनी ०२४३६-२२५७५७. ई-मेल- dyrto.57-mh@mah.gov.in

## हिंदू समाजासाठी स्मशानभूमी व गोद्री नदीवरील पुलाच्या मागणीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष, आमरण उपोषणाचा इशारा

**जिंतूर प्रतिनिधी :** जिंतूर तालुक्यातील चारठाणा गावातून वाहणाऱ्या गोद्री नदीवर पूल बांधणे व हिंदू धर्मासाठी स्वतंत्र स्मशानभूमी उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी वारंवार निवेदन देऊनही जिल्हा प्रशासनाने दखल घेतली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. याबाबत तातडीने कार्यवाही न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा श्रीपाद रवींद्र जोशी व संदीप शिवादास जाधव देशमुख यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाव्दारे दिला आहे.

या बाबतीत सविस्तर माहिती अशी की सदर मागणी संदर्भात 7 डिसेंबर 2022 व 7 फेब्रुवारी 2023 रोजी तसेच त्यानंतर अनेकदा लेखी निवेदने जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना देण्यात आले आहेत. मात्र आजतागायत कोणतीही ठोस कार्यवाही कींवा हालचाल झाली नाही,




असे निवेदनात म्हटले आहे. स्मशानभूमी अभावी व नदीवर पूल नसल्याने चारठाणा व परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. पावसाळ्यात नदीला पूर आल्यास गावाचा संपर्क तुटतो. प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही सकारात्मक निर्णय न झाल्याने जनतेत संतापाची लाट उसळली आहे.

या निवेदनानंतरही योग्य ती कार्यवाही न झाल्यास आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबावा लागेल. या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीस सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील", असा इशारा दिलेल्या एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी कार्यालय परभणी यांना अर्जदार श्रीपाद जोशी व संदीप जाधव यांनी दिला आहे.

सदर निवेदनाच्या प्रती तहसील कार्यालय जिंतूर, पंचायत समिती जिंतूर व ग्रामपंचायत कार्यालय चारठाणा यांनाही देण्यात आल्या आहेत. दिनांक 30/06/2026 रोजी हे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात आले.

# चोरांनी आधी घरात बसून खाल्ले गुलाबजाम; सोन्याचे दागिने, ब्रँडेड साड्या आणि रोख रकमेसह एकूण 80 हजारांचा ऐवज लंपास



हिंदू प्रकाशवार्ता /प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : येथील सातारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सुधाकर नगर भागात एका बंद घराला लक्ष्य करत अज्ञात चोरांनी सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह तब्बल 80 हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे, चोरी झालेले हे घर थेट पोलीस कॉलनीला लागून आहे.

पोलीस कॉलनीच्या शेजारीच पाच चोरांनी आरामात घरात बसून गुलाबजामवर ताव मारला आणि तब्बल दोन ते तीन तास मुक्काम ठोकून घरातील साहित्याची अक्षरशः नासधूस केली.

या अनोख्या आणि धाडसी चोरीमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली असून नागरिकांमधून पोलिसांवर गंभीर शंका उपस्थित केल्या जात आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, सुधाकर नगर येथील एका घरात घरमालक बाहेर गेले असताना ही घटना घडली. घराचे कुलूप तोडून आत शिरलेल्या चोरांना घरात गुलाबजाम मिळून आले. चोरांनी आधी शांतपणे बसून गुलाबजाम खाल्ले. त्यानंतर तब्बल दोन ते तीन तास घरातच थांबून त्यांनी संपूर्ण घराची सावकाश झडती घेतली. चोरी करताना चोरांनी संपूर्ण घराची उचकापाचक केली असून घरातील संसाराची पूर्णपणे दैना करून टाकली होती. चोरांनी केवळ सोन्या-चांदीवरच हात साफ केला नाही, तर घरातील दैनंदिन गरजेच्या आणि महागड्या वस्तूही चोरून नेल्या. चोरांनी गळ्यातील सोन्याची चैन, कानातले आणि ४०,००० रुपयांची रोख रक्कम (कॅश) लंपास केली. याशिवाय घरमालकाच्या महागड्या वापरात असलेल्या ब्रँडेड साड्या, घरातील विविध प्रकारच्या डाळी, साखर, भांडी आणि गृह उपयोगी वस्तूंचाही यात समावेश आहे. एवढेच नव्हे तर, घरात असलेले ब्युटी पार्लरचे महागडे सामानही चोरांनी पोत्यात भरून लंपास केले. चोरी गेलेल्या एकूण मालाची किंमत सुमारे ८०,००० रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे.याप्रकरणी सातारा पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल करण्यात आली असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.

## पोलीस कॉलनीशेजारीच धाडस; नागरिकांमध्ये भीती आणि संताप

**हद्दीत गस्त घालणाऱ्या पोलिसांचे निवासस्थान असलेल्या पोलीस कॉलनीला अगदी लागूनच हे घर असतानाही चोरांनी तिथे २-३ तास थांबून, खाण्यापिण्याचा आस्वाद घेत चोरी केली. यामुळे पोलिसांच्या गस्तीवर आणि सुरक्षेवर नागरिकांनी थेट शंका उपस्थित केली आहे. "जर पोलीस कॉलनीच्या शेजारीच नागरिक सुरक्षित नसतील, तर सामान्य जनतेने कुणाच्या भरवशावर राहायचे?" असा संतप्त सवाल रहिवाशांमधून विचारला जात आहे. या घटनेमुळे सुधाकर नगर परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, पोलिसांनी चोरांचा त्वरित छडा लावावा, अशी मागणी केली जात आहे.**

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मूल्याधिष्ठित शिक्षण काळाची गरज : विनय चीद्रीस

### एमआयटीमध्ये शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांसाठी 'सार्वत्रिक मानवी मूल्ये' विषयक जनजागृती सत्र

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी केवळ शैक्षणिक ज्ञान पुरेसे नसून त्यांच्यामध्ये मानवी मूल्ये, परस्पर संबंधांची जाणीव, जबाबदारीची भावना आणि सामाजिक बांधिलकी विकसित होणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मध्ये याच मूल्याधिष्ठित शिक्षणावर विशेष भर देण्यात आला असून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षक व शिक्षण अधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन सेंटर फॉर युनिव्हर्सल ह्युमन व्हॅल्यूज (UHV), महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (MIT)चे विषयतज्ज्ञ विनय चीद्रीस यांनी केले.



जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अश्विनी लाठकर यांच्या पुढाकाराने गुरुवारी एमआयटी महाविद्यालयात 'सार्वत्रिक मानवी मूल्ये' (Universal Human Values-UHV) विषयक जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रात शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी आणि विशेष शिक्षकांसह सुमारे ५० अधिकारी सहभागी झाले.

यावेळी विनय चीद्रीस यांनी विद्यार्थ्यांमध्ये समज, सुसंवाद, विश्वास, परस्पर संबंध आणि सुविधा यांचा समतोल विकास घडवून आणण्यासाठी शाळा आणि शिक्षकांनी मूल्याधिष्ठित शिक्षणाला प्राधान्य देण्याची गरज स्पष्ट केली. शिक्षण व्यवस्थेतील अधिकारी या परिवर्तन प्रक्रियेतील महत्त्वाचा दुवा असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आरती मोहनपुरकर यांनी केले. गटशिक्षणाधिकारी आर. डी. महाजन यांनी मनोगत व्यक्त केले, तर डॉ. लीना उत्तरवार यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उपशिक्षणाधिकारी दिपाली थावरे तसेच विस्तार अधिकारी सीमा मेहत्रे, सिताराम पवार, दिलीप शिरसाट आणि जालम चौरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पेपरफुटीविरोधात विद्यार्थ्यांचा 6 जुलैला 'आक्रोश मोर्चा'

हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : राज्यभरात विविध स्पर्धा परीक्षा आणि शासकीय भरती परीक्षांमधील कथित पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. या भ्रष्ट कारभाराविरोधात आणि विद्यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी ६ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती संभाजीनगर येथील ऐतिहासिक क्रांती चौकात एका भव्य 'विद्यार्थी आक्रोश मोर्चा'चे आयोजन करण्यात आले आहे. या आंदोलनात जिल्ह्यातील व परिसरातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.गेल्या काही काळापासून परीक्षा पद्धतीतील त्रुटींमुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागले आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या मोर्चात संपूर्ण स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवारांच्या आर्थिक आणि मानसिक हक्कांचे सरकारने तात्काळ संरक्षण करावे. प्रमुख मागण्या लावून धरल्या जाणार आहेत.

# पैठण गेट परिसरातील ज्युस सेंटर्सवर अन्न व औषध प्रशासनाचा छापा; मुदतबाह्य दूध आणि मँगो पल्प जप्त!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : शहरातील नामांकित पैठण गेट परिसरातील ज्युस सेंटर्सवर अन्न व औषध प्रशासनाने (FDA) धडक कारवाई केली आहे. या कारवाईत एका प्रसिद्ध ज्युस सेंटरमध्ये चक्क मुदतबाह्य दूध आणि मँगो पल्प वापरून ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.



प्रशासनाने हा सर्व साठा जप्त करून जागीच नष्ट केला आहे. २ जुलै रोजी अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या पथकाने पैठण गेट येथील पार्किंग समोर असलेल्या 'लकी ज्युस सेंटर' या पेढीची अचानक तपासणी केली. या तपासणी दरम्यान ज्युस तयार करण्यासाठी मुदतबाह्य पास्चुराइज्ड होमोजनाइज्ड टोनड दूध आणि अल्फान्सो मैंगो पल्पचा साठा वापरला जात असल्याचे अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. प्रशासनाने तत्परता दाखवत हा सर्व आरोग्यास घातक ठरणारा साठा जागीच नष्ट केला. याशिवाय, सदर पेढीमध्ये ज्युस व शेकमध्ये 'आईस्क्रीम' ऐवजी 'फ्रोझन डेझर्ट'चा वापर केला जात असल्याचेही समोर आले. तसेच संपूर्ण पेढीमध्ये कमालीची अस्वच्छता आढळून आली आहे. याच कारवाईचा भाग म्हणून पथकाने पैठण गेट परिसरातील इतर दोन मोठ्या पेढ्यांचीही झाडाझडती घेतली.

यात 'फ्रेश ज्युस सेंटर' आणि 'न्यू लकी ज्युस सेंटर' या ठिकाणी तपासणी करण्यात आली. या दोन्ही अन्नव्यवसायिकांना तात्काळ स्वच्छता राखण्याबाबत कडक सूचना व ताकीद देण्यात आली आहे.

सदर धडक कारवाई अन्न व औषध प्रशासनाचे सह आयुक्त श्रीकांत करकाळे यांच्या आदेशानुसार आणि सहायक आयुक्त दयानंद पाटील यांच्या थेट मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत अन्न सुरक्षा अधिकारी वर्षा रोडे, प्रशांत अजिंठेकर, फरीद सिद्दीकी आणि कीर्तिका झाडे यांच्या पथकाने सहभाग घेतला.

**अन्न व औषध प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, ज्युस सेंटरमध्ये आढळलेल्या गंभीर त्रुटी आणि तपासणी अहवालाच्या आधारे संबंधितांवर कायद्यानुसार पुढील कडक कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ग्राहकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.**

# राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी ऑनलाइन अर्ज सुरु

### 10 जुलैपर्यंत अर्जाची मुदत; शिक्षक दिनी होणार पुरस्कार वितरण

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय व समर्पित कार्य करणाऱ्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी राज्य शासनाकडून दिल्या जाणाऱ्या 'क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार २०२५-२६' साठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुक व पात्र शिक्षकांनी १० जुलै रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया राबविण्यात येत असून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच मान्यताप्राप्त अनुदानित खासगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना अर्ज करता येणार आहे. यंदा पुरस्कारांची निवड पूर्णपणे वस्तुनिष्ठ निकषांच्या आधारे करण्यात येणार आहे.

ऑनलाइन अर्जानंतर जिल्हास्तरावर शाळा भेटी, मूल्यमापन, मुलाखती व पडताळणीची प्रक्रिया राबविण्यात येईल. त्यानंतर राज्यस्तरीय निवड समितीकडून अंतिम निवड करून शिक्षक दिनानिमित्त ५ सप्टेंबर रोजी पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अश्विनी लाठकर यांनी सर्व मुख्याध्यापकांनी आपल्या कार्यक्षेत्रातील पात्र शिक्षकांना अर्ज करण्यासाठी प्रोत्साहित करावे. किमान पाच शिक्षकांचे अर्ज सादर होतील, यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असे आवाहन केले आहे.

## पुरस्काराचे वेळापत्रक

**• २७ जून ते १० जुलै – ऑनलाइन अर्ज नोंदणी • १४ ते १७ जुलै – जिल्हास्तरीय शाळा भेट व मूल्यमापन • १८ ते २२ जुलै – मुलाखत, पडताळणी व शिफारशी • २४ ते ३० जुलै – राज्यस्तरीय मुलाखत व पडताळणी • ५ ऑगस्ट – राज्य निवड समितीची बैठक • १० ऑगस्ट – अंतिम शिफारस शासनाकडे • १२ ऑगस्ट – शासन निर्णय जाहीर • ५ सप्टेंबर – शिक्षक दिनी राज्य शिक्षक पुरस्कार वितरण**

# आषाढी वारीसाठी जिल्हा परिषद आरोग्य विभाग सज्ज; ५१ आरोग्य पथकांकडून १२ हजार वारकऱ्यांना वैद्यकीय सेवा

### 45 दिंड्यांसोबत 'ऑन द स्पॉट' उपचार, 24 तास रुग्णवाहिका, शुद्ध पाणी, फॉगिंग व अन्न तपासणीवर विशेष भर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : आषाढी वारीनिमित्त पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या वारकऱ्यांना अखंड, तातडीची आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद आरोग्य विभागाने व्यापक नियोजन केले आहे. १ जुलैपासून विशेष आरोग्य मोहिमेला सुरुवात झाली असून, जिल्ह्यातील ४५ दिंड्यांमधील सुमारे १२ हजार वारकऱ्यांसाठी ५१ आरोग्य पथके कार्यरत करण्यात आली आहेत.

जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, आरोग्य व शिक्षण समितीच्या सभापती अनिताताई मोठे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी मीनू पी. एम. आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे यांच्या नियोजनातून ही व्यवस्था उभारण्यात आली आहे. ४५ आरोग्य पथके दिंड्यांसोबत पायी प्रवास करत वारकऱ्यांना तत्काळ उपचार देणार असून, श्री संत जनार्दन स्वामी पालखी (देवगिरी) आणि श्री संत एकनाथ महाराज पालखी (पैठण) यांच्यासाठी स्वतंत्र आरोग्य पथकेही नियुक्त करण्यात आली आहेत.

पालखी मार्गावर फिरती वैद्यकीय पथके, १०८ व १०२ रुग्णवाहिका तसेच कार्डियाक रुग्णवाहिका २४ तास तैनात राहणार आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये जीवनरक्षक औषधांचा साठा उपलब्ध करून देण्यात आला असून, प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि आरोग्य कर्मचारी आपत्कालीन सेवेसाठी सज्ज ठेवण्यात आले आहेत.

वारकऱ्यांना सुरक्षित पिण्याचे पाणी मिळावे यासाठी पाणी स्रोतांची तपासणी व निर्जंतुकीकरण केले जात आहे. अन्न व औषध प्रशासनामार्फत दिंडी मार्गावरील हॉटेल्स व खाद्यपदार्थ विक्रेत्यांची तपासणी केली जाणार आहे. तसेच, संसर्गजन्य आजारांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी मुक्कामाच्या ठिकाणी नियमित फॉगिंग, अबेटिंग आणि कीटकनाशक फवारणी केली जात आहे.

मुक्कामस्थळी अत्यावश्यक आरोग्य सेवा कक्ष उभारण्यात आले असून, आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचारी वारकऱ्यांना वैयक्तिक स्वच्छता, शुद्ध पाणी, सर्पदंश प्रतिबंध आणि प्रथमोपचाराबाबत जनजागृती करत आहेत. या संपूर्ण मोहिमेच्या समन्वयासाठी जिल्हा सर्वेक्षण अधिकारी डॉ. एस. शैलजा, साथरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. सारिका लांडगे आणि जिल्हा माहिती व्यवस्थापक नरेंद्र बावनथडे यांची जिल्हास्तरीय नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, तालुका आरोग्य अधिकारी स्थानिक समन्वयाची जबाबदारी सांभाळत आहेत.


वारकऱ्यांचा पंढरपूरचा प्रवास सुरक्षित, निरोगी आणि सुखकर व्हावा यासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी सेवाभावाने कार्यरत असल्याचे प्रशासनाने सांगितले.

# घाटी रुग्णालयात 'डिजिटल गेटवे टू अनाटॉमी अँड देहदान' क्यूआर कोडचे लोकार्पण

### डिजिटल माध्यमातून देहदानाची संपूर्ण माहिती एका क्लिकवर; जनजागृतीला मिळणार नवी दिशा

हिंदू प्रकाशवार्ता :प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (घाटी) येथील शरीररचनाशास्त्र विभागाच्या वतीने 'डिजिटल गेटवे टू अनाटॉमी अँड देहदान' या क्यूआर कोडचे लोकार्पण अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते करण्यात आले. वैद्यकीय शिक्षण, देहदान जनजागृती आणि नागरिकांना डिजिटल माध्यमातून सहज व विश्वासार्ह माहिती उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला आहे.



यावेळी शरीररचनाशास्त्र विभागप्रमुख डॉ. अर्चना कल्याणकर-तुंगेनवार, भूलशास्त्र विभागप्रमुख डॉ. गायत्री तडवळकर, उपाधिष्ठाता डॉ. विनोद मुंदडा, डॉ. काशिनाथ गर्कल, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुचिता जोशी, फिजिओलॉजी विभागप्रमुख डॉ. अंजली शेटे, डॉ. शिल्पा आसेगावकर, आस्था फाउंडेशनचे जयंत सांगवीकर, लायन्स क्लबचे अनिल लुनिया, सहयोगी प्राध्यापक डॉ. स्वप्ना आंबेकर, डॉ. हिजाब अख्तर, सहाय्यक प्राध्यापक डॉ. पल्लवी चव्हाण, निवासी डॉक्टर, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अनंत धनवटे व डॉ. नचिकेत शेरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. वैशाली किरवले यांनी केले.

यावेळी बोलताना अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी देहदानाविषयी समाजात असलेले गैरसमज दूर करण्याची गरज अधोरेखित केली. देहदान ही केवळ वैद्यकीय शिक्षणासाठीची देणगी नसून भावी डॉक्टर घडविण्यासाठी आणि समाजहितासाठी दिलेले सर्वोच्च योगदान असल्याचे त्यांनी सांगितले. देहदानाबाबत अधिक जनजागृती करण्यासाठी महाविद्यालयामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रास्ताविकात डॉ. अर्चना कल्याणकर-तुंगेनवार यांनी विभागाच्या डिजिटल परिवर्तनाची माहिती दिली. या क्यूआर कोडच्या माध्यमातून नागरिकांना शरीररचनाशास्त्र विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर थेट प्रवेश मिळणार असून, विभागातील शैक्षणिक उपक्रम, संशोधन, देहदानाची संपूर्ण प्रक्रिया, नोंदणी अर्ज, आवश्यक कागदपत्रे, संपर्क माहिती तसेच जनजागृतीपर साहित्य एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे देहदानाबाबत पारदर्शक, विश्वासार्ह आणि अद्ययावत माहिती नागरिकांना सहज मिळू शकेल.

कार्यक्रमादरम्यान एका देहदात्याच्या नातेवाईकांचा अधिष्ठात्यांच्या हस्ते कृतज्ञतापूर्वक सत्कार करण्यात आला. तसेच त्यांना देहदानाचे प्रमाणपत्र प्रदान करून दिवंगत देहदात्यांच्या वैद्यकीय शिक्षणासाठीच्या अमूल्य योगदानाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने आदरपूर्वक कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

तंत्रज्ञान, वैद्यकीय शिक्षण आणि सामाजिक बांधिलकी यांचा प्रभावी संगम घडवून आणणारा हा उपक्रम देहदान जनजागृतीला नवी दिशा देणारा ठरेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. प्रत्येक नागरिकाने देहदानाविषयी माहिती जाणून घेऊन आपल्या कुटुंबीयांशी सकारात्मक संवाद साधावा आणि मानवसेवेच्या या महान कार्यात सहभागी

# मनपाची कर वसुली मोहीम; एकाच दिवशी 26 मालमत्ता सील, 64.91 लाखांचा कर वसूल

### सलग तिसऱ्या आठवड्यात धडक कारवाई; सर्व 10 झोनमध्ये थकबाकीदारांविरुद्ध मोहीम

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने मालमत्ता कर वसुलीसाठी सलग तिसऱ्या आठवड्यात धडक मोहीम राबवत गुरुवारी (दि. २) एकाच दिवशी २६ थकबाकीदारांच्या मालमत्ता सील केल्या. या कारवाईदरम्यान तब्बल ६४ लाख ९१ हजार रुपयांचा कर वसूल करण्यात आला.

महापालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार ही विशेष मोहीम राबविण्यात आली. अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे आणि उपआयुक्त विकास नवाळे यांनी सर्व १० झोनमधील प्रत्येकी १५ ते २० मोठ्या थकबाकीदारांची यादी तयार करून संबंधित कर वसुली पथकांना कारवाईचे निर्देश दिले होते. त्यानुसार दिवसभर सर्व झोनमध्ये थकबाकीदारांविरुद्ध सीलिंग व कर वसुलीची प्रभावी कारवाई करण्यात आली.

झोननिहाय कारवाईमध्ये झोन क्र. १ मध्ये १० मालमत्ता, झोन २ मध्ये ४, झोन ३ मध्ये २, झोन ४ मध्ये १, झोन ५ मध्ये ३, झोन ६ मध्ये २, झोन ७ मध्ये १, झोन ८ मध्ये १ आणि झोन १० मध्ये २ मालमत्ता सील करण्यात आल्या. झोन ९ मध्ये कोणतीही मालमत्ता सील करण्यात आली नाही.

कर वसुलीत झोन १० मधून सर्वाधिक २९ लाख रुपये, झोन ७ मधून १५.५९ लाख रुपये, झोन ९ मधून १२.१९ लाख रुपये, झोन ४ मधून ४.६१ लाख रुपये, झोन ३ मधून १.९४ लाख रुपये, झोन ६ मधून १ लाख रुपये आणि झोन २ मधून ५८ हजार ७१२ रुपये कर वसूल झाला. झोन १, ५ आणि ८ मध्ये सीलिंगची कारवाई झाली असली तरी त्या ठिकाणी तत्काळ कर वसुली झाली नाही.

महानगरपालिकेने मालमत्ता कर थकबाकीदारांना तातडीने कर भरून दंडात्मक कारवाई टाळण्याचे आवाहन केले असून, आगामी काळातही ही विशेष वसुली मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911